# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०२३

-----------------------------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ / अग्रहायण २०, १९४५ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री** | |
| **(३)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(४)** | **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | |
| **(५)** | **अल्पसंख्यांक विकास व औकाफ, पणन मंत्री** | |
| **(६)** | **शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | |
| **(७)** | **अन्न व औषध प्रशासन मंत्री** | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २३**

-----------------------------------

### चंद्रपूर जिल्ह्यातील पोंभुर्णा तसेच बल्लारपूर-राजूरा मार्गावरील रस्त्याची झालेली दुरवस्था

**(१) * ७५३७६ श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्याला जोडणारा आक्सापूर-चिंतलधाबा रस्ता बांधण्यासाठी कोटयवधी रुपये खर्च करण्यात येऊनही अल्पावधीत रस्त्यावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या जिल्ह्यातील बल्लारपूर-राजूरा मार्गावरही खड्डे पडले असून वर्धा नदीवरील पुलाला कठडे नसल्याने अनेक अपघात घडत असून नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रस्ता व नदी पुलावरील कठडा दुरुस्ती करण्यासह संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) आक्सापूर ते चिंतलधाबा प्रजिमा-२४ या रस्त्यांची एकूण लांबी ७.५०० कि.मी. आहे.

सदर रस्त्यावर ६.३०० कि.मी.लांबीमध्ये रुंदीकरण व मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मार्च-२०२३ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेली रस्त्यांची लांबी संबंधित कंत्राटदारांकडून दुरुस्त करण्यात येत आहे.

उर्वरित १.२०० कि.मी. लांबीमध्ये रुंदीकरण, मजबूतीकरण व डांबरीकरणाचे रक्कम रु.३०० लक्ष चे मंजूर कामाचे कार्यारंभ आदेश दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२३ रोजी निर्गमित करण्यात आले असून सदरचे काम ऑक्टोबर, २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(२) वरोरा-चंद्रपूर-बामणी या राज्यमार्गावरील बल्लारपूर ते बामणी ही १३.८०० कि.मी.लांबी खाजगीकरणांतर्गत प्रकल्पामध्ये समाविष्ठ असून, सदर लांबीतील देखभाल व दुरुस्तीची कामे सवलती करारनाम्यातील तरतूदीनुसार संबंधित उद्योजकांकडून करुन घेण्यात आले आहे.

बामणी-राजूरा राष्ट्रीय महामार्ग वरील ७ कि.मी लांबीमध्ये अतिवृष्टीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या रस्त्यांच्या दुरुस्ती काम पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीस सुस्थितीत आहे. सदर रस्त्यावर वर्धा नदीवरील बुडीत पूलांचे पावसाळ्यादरम्यान काढलेले लोखंडी कठडे पुन:श्च लावण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आणिकगाव, चेंबूर, मुंबई येथील महापालिकेच्या शाळेतील**
**विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनातून झालेली विषबाधा**

**(२) * ७१९६५ श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आणिकगाव, चेंबूर, मुंबई येथील मुंबई महापालिकेच्या शाळेत वितरित करण्यात आलेल्या मध्यान्ह भोजनातून १६ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचे दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बारा ते तेरा वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना उलटी व मळमळ सुरु झाल्याने त्यांना गोवंडी येथील शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

दि.१३ ऑक्टोबर, २०२३ रोजी आणिकगाव मनपा हिंदी शाळेमधील मध्यान्ह भोजनाच्या सेवनानंतर १६ विद्यार्थ्यांना उलटी व मळमळ सुरु झाल्याने त्यांना उपचारासाठी रूग्णालयात दाखल केले होते.
(३) संबंधित आहार पुरवठा करणाऱ्या संस्थेचे कामकाज काढून घेण्यात आले आहे. तसेच, संबंधित संस्थेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याबाबत**

**(३) * ७२१०२ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळाबाह्य, स्थलांतरित आणि शाळांमध्ये नियमित उपस्थित नसलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी दिनांक १७ ते ३१ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मोहिम राबविली असता मोठ्या प्रमाणात मुले शाळाबाह्य असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांची आधार नोंदणी नसल्याने आणि काहींची माहिती चुकीची असल्याने त्यांची नावे पटसंख्येत येणार नसल्याची भीती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण विभागाने केलेल्या सर्वेक्षणात १५१० मुले शाळाबाह्य असल्याचे आढळले असून त्यामध्ये ७४२ मुलांचा तर ७६८ मुलींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईत १६४, ठाण्यात ३८०, रायगडमध्ये ३८ तर पालघरमध्ये ९२८ मुले शाळाबाह्य असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शिक्षण विभागाने ५८२ विद्यार्थ्यांना शाळेत दाखल केले असून सदर मोहिमेनंतर अद्यापही ९३२ मुले शिक्षणापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) ३ ते १८ वयोगटातील शाळाबाहय, अनियमित व स्थलांतरीत बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी दिनांक १७ ऑगस्ट, २०२३ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ या कालावधीमध्ये राज्यात सर्वत्र सर्वेक्षण राबविण्यात आले. सदर सर्वेक्षणात राज्यात १६२४ मुले व १५९० मुली असे एकूण ३२१४ बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) सदर सर्वेक्षणात राज्यात १६२४ मुले व १५९० मुली असे एकूण ३१११४ बालके शाळाबाह्य आढळून आली आहेत.
(४) सदर सर्वेक्षणानुसार संपूर्ण मुंबईत एकूण ३५६ बालके शाळाबाहय आढळून आले असून ही सर्व ३५६ बालके शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत. ठाणे जिल्ह्यात ३८० बालके शाळाबाहय आढळून आले असून त्यापैकी २९७ बालके शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत, रायगड मध्ये ३८ बालके शाळाबाहय आढळून आले असून ती सर्व ३८ बालके शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत. तर पालघर मध्ये ९२८ बालके शाळाबाहय आढळून आले असून त्यापैकी सर्वेक्षणाच्या कालावधी मध्ये ७१ बालके व सर्वेक्षणाच्या कालावधी नंतर ९४ अशी एकूण १६५ बालके शाळेत दाखल करण्यात आली आहेत. उर्वरीत ७६३ बालकांना देखील नजीकच्या शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(५) सदर सर्वेक्षणात राज्यात १६२४ मुले व १५९० मुली असे एकूण ३२१४ बालके शाळाबाह्य आढळून आली असून त्यापैकी ८७५ मुले ७६५ मुली शाळेत दाखल करण्यात आलेली आहेत. उर्वरीत ७४९ मुले व ८२५ मुली अशा एकूण १५७४ बालकांना देखील शाळेत दाखल करण्याची कार्यवाही सुरू असून त्यांनाही लवकरच शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याची कार्यवाही राज्यभरात सुरू आहे.
(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्ह्यात शासन मान्यतेविना तांदळाची उचल केल्याबाबत

**(४) * ७२२९० श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न महामंडळ गोदामातील तांदुळ, गहू उचलण्यासाठी मा.मंत्री, अन्न नागरी पुरवठा व विभागाचे सचिव यांची मान्यता घ्यावी लागते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गोंदिया जिल्ह्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत नियतनानुसार (कोटा) वाटप करण्यात येणारा ८६ हजार क्विंटल कच्चा तांदूळ (सीएमआर) अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या मान्यतेविना उचलण्यात आल्याचे दिनांक २३ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अन्न व नागरी पुरवठा विभागातील अधिकारी व वाहतूक कंत्राटदारांच्या संगनमताने उक्त गैरव्यवहार सुरु असल्याचे निदर्शनास आल्यावर याबाबत चौकशी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.छगन भुजबळ :** (१) व (२) गोंदिया जिल्ह्यामध्ये ३ महिन्यांच्या आवश्यक नियतनापेक्षा जास्त सीएमआर उपलब्ध असल्याने शासनाने दिनांक ०३.०७.२०२३ च्या पत्रान्वये दिलेल्या मान्यतेनुसार अहमदनगर जिल्ह्याला माहे सप्टेंबर, २०२३ चे ८६ हजार क्विंटल इतके आवश्यक नियतन पुरविण्यात आलेले आहे. प्रस्तुत प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झालेला नाही.
(३) होय, शासनस्तरावर याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास आणण्यात आली आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील टोल वसुलीसंदर्भात निश्चित धोरण ठरविण्याबाबत**

**(५) * ७१८४४ श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनेक ठिकाणी सद्य:स्थितीत टोल नाके सुरु असून मोठ्या प्रमाणात टोल वसुली करुन देखील रस्त्यांची दुरवस्था असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीए) उभारलेल्या ५५ पुलांचा खर्च वसूल करण्यासाठी मुंबईच्या प्रवेशद्वारावर उभारण्यात आलेल्या ५ टोल नाक्यांद्वारे पुलांचा खर्च वसूल होवूनही अद्यापपर्यंत टोल वसूली सुरु असून त्यात दरवाढदेखील करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, मुंबई, ठाणे, मुंबई-पुणे एक्सप्रेस वे सह अन्य ठिकाणी बीओटी तत्वावर राज्यात मोठ्या बांधकाम कंपन्यांद्वारे स्वखर्चाने रस्त्यांची कामे करुन टोलच्या नावाखाली अवास्तव वसूली सुरु असून खर्चाबाबत कोणतीही पारदर्शकता नसल्याने तसेच किती खर्च लागला, किती वसूली झाली, किती वसूली बाकी आहे तसेच किती वर्षे टोल सुरु राहील इत्यादीबाबतची कुठलीही माहिती जनतेसाठी उपलब्ध करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईमध्ये टोल वसूली व टोल दरवाढीबाबत ठिकठिकाणी आंदोलने देखील करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, एकीकडे मोठ्या प्रमाणात कंपन्या टोल वसूली करत असताना मुंबईतील ५ टोल नाक्यांसाठी टोल करार म्हणून नोंदणी करुन ३ टक्के दराने मुद्रांक शुल्क शासन तिजोरीत जमा करणे आवश्यक असताना कंत्राटदार कंपन्यांनी यास साधा व्यवसाय कर भासवत केवळ ०.२ टक्के दराने मुद्रांक शुल्क भरल्यामुळे शासनाचा कोटयवधी रुपयांचा महसूल बुडाला, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, राज्यातील टोल संदर्भात पारदर्शकता आणून निश्चित धोरण ठरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) हे अंशत: खरे आहे.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत एकूण १० प्रकल्पांवर टोल वसुली प्रगती पथावर आहे. निविदेतील तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत रस्त्यांची/पुलांची देखभाल दुरुस्ती करण्यात येते.
(२) हे अंशत: खरे आहे.
मुंबईतील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी बांधण्यात येणारे ५५ उड्डाणपूलांच्या प्रकल्पावर एकूण रु.१२५९.३८ कोटी इतका खर्च झाला आहे. सदर प्रकल्पावरील खर्च, त्या खर्चावरील व्याज, परतावा तसेच देखभाल व दुरुस्तीचा खर्च यांच्या परतफेडीसाठी महाराष्ट्र शासनामार्फत अधिसूचना क्र. खाक्षेस २००२/प्र.क्र.१५५/रस्ते-९, दिनांक २७.०९.२००२ अन्वये २५ वर्षांच्या कालावधीसाठी दिनांक ०१.१०.२००२ पासून दिनांक ३०.०९.२०२७ पर्यंत पथकर वसुलीकरिताचा हक्क महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास प्रदान करण्यात आले आहेत. तसेच, सदर अधिसुचनेनुसार निश्चित केल्याप्रमाणे दिनांक ०१.१०.२०२३ रोजी प्रकल्पातील पाच पथकर नाक्यांवर दरवाढ झालेली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास टोल स्वरुपात रु. ३१७२.४३ कोटी इतकी रक्कम प्राप्त झाली आहे. सदर रक्कमेत दिनांक १९.११.२०२६ पर्यंत पथकर वसुलीकरिता आगाऊ रक्कम रु.२१०० कोटी चा देखील समावेश आहे.
(३) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत एकूण १० प्रकल्पांवर पथकर वसूली प्रगती पथावर आहे.
वरील प्रकल्पांवरील आता पर्यंत झालेली पथकर वसूली www.msrdc.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच प्रमुख प्रकल्पांवर प्रकल्पावरील खर्च, आता पर्यंतची पथकर वसूली, शिल्लक पथकर वसूली याबाबतची माहिती इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्डद्वारे प्रदर्शित केली जाते.
(४) हे अंशत: खरे आहे.
(५) हे खरे नाही.
मुंबई प्रवेश पथकर नाक्यांचे सिक्युरिटायझेशन करणे या प्रकल्पासाठी मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी दिनांक ३०.०९.२०१० रोजी रू.४,२०,००,०००/- इतके मुद्रांक शुल्क भरले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## साळशिंगी (ता.बोदवड, जि. जळगांव) येथील कापूस व्यापाऱ्याने शेतकऱ्यांची केलेली फसवणूक

**(६) * ७२६४७ श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विनोद निकोले (डहाणू) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (जि.जळगांव) तालुक्यातील साळशिंगी व आजूबाजूच्या गावातील हजारो शेतकऱ्यांची कापूस व्यापाऱ्याने बाजारभाव किंवा शासनाने ठरवून दिलेल्या दरापेक्षा दीड ते दोन हजार रुपये प्रति क्विंटल जादा भाव देण्याचे आमिष दाखवून कोटयवधी रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित व्यापाऱ्यांविरुध्द कारवाई करुन शेतकऱ्यांचे कापसाचे चुकारे अदा करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, पणन यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे चुकारे अदा करणेबाबत तसेच संबंधितांविरुध्द कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अब्दुल सत्तार :** (१) व (२) अशी तक्रार शासनाकडे प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, अथवा पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे व त्यांच्या अधिनस्त जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगाव या कार्यालयाकडे अशी कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

### मनसर-रामटेक-तुमसर या महामार्गाचे काम करताना स्वामित्वधन न भरता साहित्य वापरल्याबाबत

**(७) * ७२६८२ ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर अंतर्गत मे. बारब्रिक प्रोजेक्टस लिमिटेड या कंत्राटदारामार्फत मनसर-रामटेक-तुमसर या महामार्गाचे बांधकाम करताना मोठ्या प्रमाणात विना रॉयल्टी रेती, मुरूम व खडी इत्यादी साहित्यांचा वापर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनास जमा केलेल्या स्वामित्वधनाच्या पासेसची चौकशी करण्याबाबत वारंवार पत्रव्यवहार होऊनही यासंदर्भात संबंधित यंत्रणांकडून अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही

सदर महामार्ग हा राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित येतो.

सदर प्रकल्पाच्या बांधकामामध्ये वापरण्यात आलेल्या रेती, मुरुम, खडी या गौणखनिजांच्या संपूर्ण स्वामित्वधनाचा भरणा कंत्राटदाराद्वारे करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

बांधकामाकरिता वापरण्यात आलेल्या गौण खनिजाच्या स्वामित्वधनाचा भरणा कंत्राटदाराने महसूल विभागास केलेला आहे व तफावत असलेल्या स्वामित्वधनाची वसूली रक्कम कंत्राटदाराच्या देयकातून कपात करुन महसूल विभागास भरणा केलेली आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सुरु असलेल्या अनधिकृत शाळांबाबत

**(८) * ७१८३६ श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ८०० हून अधिक अनधिकृत शाळा सुरू असून त्यावर कारवाई करून या शाळा बंद करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिल्यानंतरही अद्याप यासंदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण आयुक्तांनी या शाळा अटी शर्तींची पुर्तता न केल्यास बंद करण्याची कारवाई माहे एप्रिल, २०२३ अखेर पूर्ण करण्याचे आदेश सर्व जिल्हयातील शिक्षण उपसंचालकांना दिले होते तसेच या शाळांवर दंडात्मक कारवाई करावी, दंडाची रक्कम जमा न केल्यास त्यांच्या सातबारावर बोजा चढवावा, आवश्यकतेप्रमाणे गुन्हे नोंदवून शाळा बंद कराव्यात तसेच या शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे अन्य शाळांमध्ये समायोजन करण्याबाबतही आदेशात नमूद करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याअनुषंगाने कारवाई करण्यास चालढकल करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांना शिक्षण विभागाने कारणे दाखवा नोटिस बजावून शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आजही राज्यात जवळजवळ ६०० तर मुंबईत १८६ शाळा बेकायदेशीररित्या सुरुच असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या शाळा दाट लोकवस्तीत असून शाळांसाठी नियमांनुसार मोकळी जागा, मोठे मैदान, ५००० चौरस फुट जागा, ३० वर्षांचे लीज करार, २० लाख रुपयांची मुदत ठेव रक्कम अशा अनेक अटी संस्था चालकांना पूर्ण करणे शक्य नसल्याने त्यास मान्यतेअभावी या शाळा बेकायदेशीर घोषित करण्यात आल्या असून या शाळा सन १९८५ पासूनच्या व सन २०१२ पूर्वीच्या असून त्यांना सेल्फ फायनान्स कायदा लागू नसल्याने यातील मान्यतेसाठी रुपये १ लाख इतकी रक्कम भरण्याची तसेच जागेची अट शिथिल करुन अन्य अटी शर्तींच्या पुर्ततेसाठी वेळ देणेबाबतची मागणी अनेक शाळा व्यवस्थापनांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, ज्या शाळांनी अटी शर्तींची पुर्तता केली नाही अशा शाळांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य विद्यार्थी पालक महासंघाच्या प्रमुख श्रीमती दिपाली सरदेशमुख, फुले-शाहू-आंबेडकर पालक - विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रवीण यादव यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, या संपूर्ण प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी संस्थांवर, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन या शाळांमधील विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१), (२), (३) व (४) सद्य:स्थितीत राज्यातील खाजगी व्यवस्थापनाद्वारे ६६१ शाळा या अनधिकृतपणे सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने अनधिकृत शाळांवर बंद करण्याची कार्यवाही, फौजदारी गुन्हे दाखल करणे तसेच दंड आकारण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांना देण्यात आले आहेत. उक्त ६६१ अनधिकृत शाळांपैकी ७८ शाळा बंद करुन त्या शाळांमधील ६३०८ विद्यार्थ्यांचे समायोजन करण्यात आले आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील एकूण १८६ अनधिकृत शाळांपैकी १४ शाळा बंद करण्यात आल्या असून उर्वरित १७२ शाळांबाबतची तपासणी सुरु आहे.

सदर अनियमिततेच्या अनुषंगाने दिनांक १६.०६.२०२३ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक यांना कारणे दाखवा नोटीस व संबंधित शिक्षणाधिकारी यांना दिनांक २०.०७.२०२३ रोजी ज्ञापन बजावण्यात आले आहे.
(५) सन २०१२ पुर्वीच्या अनेक शाळा/संस्थांकडून स्वयंअर्थसहाय्यित शाळा अधिनियम, २०१२ अधिनियमातील तरतुदींमध्ये शिथिलता देऊन शाळा नियमित करण्याच्या अनुषंगाने शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. सदर बाब विचाराधीन आहे.
(६) सदर निवेदन विभागास प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(७) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावर रस्ते सुरक्षा सुविधा पुरविणेबाबत**

**(९) * ७४१५६ श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग जिल्हयातील मुंबई-गोवा राष्ट्रीय मार्गावर रिफ्लेक्टर, स्पीड लिमिट फलक व हेल्पलाईन नंबर इत्यादी रस्ते सुरक्षा सुविधा पुरविण्याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदारांकडून या सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित ठेकेदार मागील तीन वर्षे देखभालीची रक्कम घेत असूनही रस्ता सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक सुविधा न पुरविल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधींनी पत्रकार परिषदेमध्ये केली असून ठेकेदाराने तात्काळ सर्व सुविधा उपलब्ध करुन न दिल्यास दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी महामार्ग प्राधिकरण कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशारा लोकप्रतिनीधींनी दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित ठेकेदार तसेच जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
सदर महामार्ग राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या अखत्यारित येतो.
राष्ट्रीय महामार्गाचे मानक व मंजूर आराखडयानुसार रस्ते सुरक्षा सुविधांची प्रश्नाधीन कामे कंत्राटदाराकडून करण्यात आलेली आहेत. तसेच स्थानिकांच्या मागणीनुसार वाढीव कामेही करुन देण्यात येत आहेत.
(२) हे खरे आहे.
स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर महामार्गाच्या दुरुस्ती व देखभालीच्या अनुषंगाने रस्ते सुरक्षा सुविधा पुरविण्याविषयक दुर्लक्ष केल्याबाबत दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी आंदोलनाचा इशारा दिला होता व गणेशोत्सवापूर्वी सदर कामे पूर्ण करण्याबाबत सूचित केले होते.
त्यानुसार खड्डे भरणे व रस्ता सुरक्षेची कामे कंत्राटदाराकडून गणेशोत्सवापूर्वी करुन घेण्यात आल्यामुळे दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी आंदोलन करण्यात आलेले नाही.
(३) रस्ता दुरुस्ती व देखभालीची कामे कंत्राटदाराकडून नियमितपणे सुरु आहेत. तसेच स्थानिकांच्या मागण्या / निवेदनांनुसार कामे करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मुंबई-गोवा महामार्गाच्या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१०) * ७१८४६ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण),**

**श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती ऋतुजा लटके (अंधेरी पूर्व), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आजपर्यंत रुपये ४५०० कोटी इतकी रक्कम खर्च करुनही रस्त्याचे काम १२ वर्षांपासून प्रलंबित असून त्यावरील खर्चाचे विशेष लेखापरिक्षण करण्याचे मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास घोषित केले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, या महामार्गावरील बहादूरशेख नाका, चिपळूण येथील उड्डाणपुलाला निकृष्ट बांधकामामुळे तडे जावून तो क्रेनसह कोसळल्याची घटना दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली असून घटनेनंतर १२ तासांचा कालावधी उलटूनही राष्ट्रीय महामार्ग विभागाचे एकही अधिकारी घटनास्थळी पोहचले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेनंतर उड्डाणपुलापासून १०० मीटरवर असलेल्या वशिष्ठी नदीवरील नवीन पुलालाही ठिकठिकाणी तडे गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, या महामार्गावरील पनवेल-कासू व कासू-इंदापूर या दोन टप्प्यातील ८४ किलोमीटरच्या रस्त्याचे काम सीटीबी अत्याधुनिक तंत्रज्ञान व मशिनरीच्या सहाय्याने सुरु असून दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी पूर्ण क्षमतेने एकेरी मार्गिका वाहतुकीस खुली करण्याचे आश्वासन मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांनी माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान देऊनही अद्याप काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर १२ वर्षात जवळपास १२ हजार अपघाती मृत्यू झाले असतानांही अद्यापही हे काम पूर्ण झालेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने सखोल चौकशी करुन या महामार्गाचे काम तातडीने पूर्ण करणे तसेच या कामावरील खर्चाचे विशेष लेखापरिक्षण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रविंद्र चव्हाण :** (१) अ) पनवेल कि.मी. ०/०० ते इंदापूर कि.मी. ८४/०० या लांबीसाठी केंद्र शासनाचे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (एन.एच.ए.आय.) यांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी रुपये ५४० कोटी इतकी रक्कम दिलेली आहे.

ब) इंदापूर कि.मी.८४/०० ते पात्रादेवी कि.मी. ४७१/३०० या लांबीसाठी राष्ट्रीय महामार्ग विभाग (सा.बां.) यांचेमार्फत एकूण रुपये ३५२७.२५ कोटी इतका खर्च झालेला आहे.

क) सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्प केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग, नवी दिल्ली यांचे नियंत्रणाखाली असल्याने सदर रस्त्याच्या कामाचे लेखापरिक्षण हे केंद्र शासनाने नेमणूक केलेल्या लेखापरिक्षक, तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

(२) हे खरे नाही,

राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी घटना घडली त्यावेळी उपस्थित होते.

(३) हे खरे नाही.

वशिष्ठी नदीवरील पुल सुस्थितीत असून प्रत्यक्ष पुलाच्या बांधकामाला कोणताही तडा गेलेला नाही.

(४) पनवेल ते कासू या लांबीमध्ये डाव्या बाजू कडील ८.७५ मी. रुंदीच्या रस्त्याचे काम पूर्ण झालेले होते व कासू ते इंदापूर या लांबीमध्ये ८.७५ मी. रुंदीच्या एका बाजूचे सी.टी.बी. द्वारे (ज्याठिकाणी चौपदरीकरण झाले त्या ठिकाणी) व अस्तित्वातील दोन पदरी रस्त्याचे डांबरीकरणाने दुरुस्ती करुन गणेशोत्सवापूर्वी रस्ता सुस्थितीत करण्यात आला होता.

(५) गृह विभागाच्या अहवालानुसार सदर महामार्गावर सन २०१३ ते २०२३ (ऑक्टोबर अखेर) या कालावधीत एकूण

१६८५ अपघात घडले असून त्यात एकूण २०१० व्यक्ती अपघाती मृत्यू पावले आहेत.

(६) सद्य:स्थितीत काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्प केंद्र शासनाचे रस्ते वाहतूक व महामार्ग, नवी दिल्ली यांचे नियंत्रणाखाली असल्याने सदर रस्त्याच्या कामाचे लेखापरिक्षण हे केंद्र शासनाने नेमणूक केलेल्या लेखापरिक्षक, तसेच भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

-----------------

## राज्यात “आनंदाचा शिधा” वाटप प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

**(११) * ७३०२६ श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.झीशान सिद्दिकी (वांद्रे पूर्व), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.विनोद निकोले (डहाणू), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने गौरी-गणपतीच्या सणाला ४५० कोटी रुपये इतक्या रकमेचा आनंदाचा शिधावाटप करण्यासाठी निविदा न काढता मागील वर्षी शिधा देणाऱ्या कंत्राटदारालाच पुन्हा कंत्राट देण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिधा वाटपाच्या एका किटसाठी घाऊक बाजारामध्ये १३० रुपये पेक्षा कमी दर असतांना त्याच कंत्राटदाराकडून १८४ रुपये इतक्या रकमेचे किट खरेदी करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विनानिविदा देण्यात आलेल्या कंत्राटाकरिता प्रशासनाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, राज्यात विशेषत: चंद्रपूर जिल्ह्यात रेशनिंग दुकानावर आनंदाच्या शिधामध्ये भेसळयुक्त व कमी वजनाचे धान्य दिले जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) शासन निर्णय दिनांक २२.०८.२०२३ अन्वये गुढीपाडवा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती, इ. सणांनिमित्त निविदेद्वारे नियुक्त करण्यात आलेल्या पुरवठादारासोबतच्या करारनाम्यास पुर्वीच्याच दराने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

(४) व (५) चंद्रपूर जिल्ह्यात व राज्यातील इतर जिल्ह्यात आनंदाचा शिधा जिन्नस संच भेसळयुक्त असल्याबाबत व कमी वजनाचे शिधा जिन्नस दिले जात असल्याचे निदर्शनास आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षण हक्क अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत

**(१२) * ७१६७४ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा**

**गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळांमध्ये शिक्षण हक्क अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काच्या कोटयवधी रुपयांची प्रतिपूर्ती गत ४ वर्षांपासून केली नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शिक्षण शुल्काच्या प्रतिपूर्तीबाबत राज्य शासन व शिक्षणाधिकारी यांनी उत्तर दाखल करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१२-१३ पासून थकीत असलेली १०० टक्के रक्कम तसेच शिक्षण हक्क अधिकार (आरटीई) कायद्याप्रमाणे प्रतिपूर्तीची रक्कम प्रतिवर्षी दोन टप्प्यात द्यावी अशीही मागणी सदरहू याचिकेत असून यासंदर्भात शासनातर्फे यापूर्वीच शपथपत्र दाखल केले असता मेसा संघटनेचे वकील श्री.मिलिंद जोशी यांनी शासन व शिक्षणाधिकारी यांच्या उत्तरात विसंगती असल्याचे मा.उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकीकडे शिक्षण हक्क अधिकार (आरटीई) कायद्यांतर्गत प्रत्येक शाळांना २५ टक्के विद्यार्थी प्रवेशाची सक्ती करणे व दुसरीकडे अनेक वर्षांपासून या रकमेची प्रतिपूर्ती न केल्यामुळे शाळा आर्थिक अडचणीत आल्या असून अनेक शाळांमध्ये विद्यार्थ्यांना प्रवेश देखील नाकारण्यात आल्याचे तसेच याअंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम प्रवेश शुल्क भरण्याची सक्ती शाळांकडून करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी करुन शाळांना तातडीने शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मेसा संघटनेने मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट याचिका क्र. ४८४९/२०२१ आरटीई खर्चाची प्रतिपूर्ती रक्कम संबंधित शाळांना होत नसल्याबाबत दाखल केली आहे.

सदर याचिकेमधील शाळांना सन २०१३-१४ ते २०१९-२० या कालावधीमधील ६,४७,१७,८५८/- इतकी प्रतिपूर्ती रक्कम देय आहे. आतापर्यंत या शाळांना ५,७७,२६,९४४/- इतकी रक्कम वितरीत करण्यात आली असून उर्वरीत ६९,९०,९१४/- इतकी रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) या योजनेसाठी आतापर्यंत राज्य शासनाने रू.९०४.२६ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात रू.२०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. यापैकी रू.७६.७५ कोटी निधी वितरीत करण्यात आला असून उर्वरीत निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांबाबत

**(१३) * ७३९२४ श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.नारायण कुचे (बदनापूर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१० मध्ये मुंबई विद्यापीठात १३१९ मंजूर केलेल्या पदांपैकी सध्या ९२५ हंगामी आणि ३६४ नियमित शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत असून सन २०१३ पासून राज्यातील विद्यापीठात पदभरतीला मंजूरी दिली नसल्याने सुमारे १३१९ मंजूर पदांपैकी विद्यापीठात अजूनही ६८० पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे विद्यापीठात परीक्षांचे विस्कळीत वेळापत्रक, प्रवेशपत्र, प्रश्नपत्रिका तपासणी व पुनर्तपासणी, प्रलंबित निकाल तसेच जाहीर झालेल्या निकालांमधील त्रुटी दूर करणे इत्यादी अनेक कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे विविध विभागाचे कामकाज विस्कळीत झाल्याने तेथील कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढत असल्याचे दिनांक २० मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन तातडीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) मुंबई विद्यापीठातील शिक्षकेतर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०४.०५.२०२० च्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तथापि, विद्यापीठाचे कामकाज सुरळीत चालावे याकरिता अत्यावश्यक शिक्षकेतर पदे भरण्यास मंजूरी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. रिक्त पदांचा कार्यभार अतिरिक्त स्वरुपात सोपवून दैनंदिन कामकाज केले जाते. क्लस्टर महाविद्यालये, प्राचार्य, अधिष्ठाता, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, प्राध्यापक यांच्या सहाय्याने उत्तर पत्रिकांचे मूल्यांकन विहित वेळेत करण्यात येत असून परीक्षांचे निकाल विहित वेळेतच जाहिर करण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा व गोंदिया जिल्हयात जिल्हा मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळांतर्गत धान खरेदी करणाऱ्या संस्थांनी केलेला गैरव्यवहार

**(१४) * ७१८७९ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खरीप व रब्बी हंगामात शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळू नये यासाठी जिल्हा मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाकडून धान खरेदी केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा व गोंदिया जिल्हयात जिल्हा मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळांतर्गत धान खरेदी करणाऱ्या संस्थांनी अधिकाऱ्यांच्या संगनमताने जवळपास ३० हजार क्विंटल धान जमा न केल्यामुळे शासनाचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय ,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) पणन हंगाम २०२२-२३ मध्ये भंडारा जिल्ह्यात ४ संस्थांनी एकूण ३९४१६.१३ क्विंटल धान उपलब्ध करुन दिलेला नाही. या संबंधित ४ संस्थांवर एफ.आय.आर. दाखल करण्यात आलेला असून वसूलीसाठी आर.आर.सी. प्रक्रीया अंतर्गत कार्यवाही सुरु आहे. तसेच गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया तालुक्यातील मे.श्रीराम अभिनव सहकारी संस्था

मर्या, चुटिया या संस्थेने खरीप हंगामातील ६७७३.७३ क्विंटल व रब्बी हंगामातील १५९९६.०० क्विंटल धान राईस मिलधारकांना उपलब्ध करुन दिलेला नाही. या संस्थेने धान खरेदीमध्ये अनियमितता केल्याने त्यांचेविरुद्ध पोलीस स्टेशन, सालेकसा ता.सालेकसा, जि.गोंदिया येथे एफ.आय.आर.क्र.०२०९, दिनांक २६.०८.२०२३ रोजी दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वडराई-शिरगाव (ता.जि.पालघर) येथील जवाहर नवोदय विद्यालयातील विद्यार्थ्यांचे रॅगिंग केल्याबाबत**

**(१५) * ७१८७२ श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्रीमती मंजुळा गावीत (साक्री), श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडराई-शिरगाव (ता.जि.पालघर) येथील जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता दहावीत शिकणाऱ्या ३५ मुलांचे इयत्ता अकरावीतील विद्यार्थ्यांनी रॅगिंग केल्याचा धक्कादायक प्रकार दिनांक ३० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उदयगिरी वसतिगृहामध्ये रात्री इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना सूचना द्यावयाच्या असल्याचे सांगून इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांनी त्यांना बोलावून घेतले असता, ज्या विद्यार्थ्यांना पोहोचण्यास उशीर झाला त्यांना शिक्षेच्या स्वरूपात जबर मारहाण करण्यात आली असून याबाबत बाहेर वाच्यता केल्यास अधिक शिक्षा देण्यात येईल अशी धमकी देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मारहाण झालेल्या विद्यार्थ्यांच्या कानाला यामुळे जबर दुखापत झाल्यामुळे त्याच्या कानावर तातडीची शस्त्रक्रिया करावी लागली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी प्राचार्याने नेमलेल्या चौकशी समितीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) तसेच, उक्त प्रकरणी सातपाटी पोलीस ठाण्याचे स.पो. निरिक्षक श्री.प्रेमनाथ ढोले यांनी शाळेत जाऊन चौकशी केली असता शाळेने तक्रार करण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन रॅगिंग प्रकारांना आळा घालण्याबाबत तसेच संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) किरकोळ जखमा झालेल्या होत्या. शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता लागली नाही.

(४) विद्यार्थ्यांमध्ये मारहाण झाल्याचे सिद्ध होते.

(५) हे खरे आहे

(६) विद्यार्थ्यांना समन्स देऊन पालकांच्या ताब्यात देण्यात आले.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत असलेल्या मुंबई मंडळात झालेला गैरव्यवहार**

**(१६) * ७२५१३ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत मुंबई मंडळाचे २५० ते ३५० कोटी रुपये इतक्या रकमेचे बजेट असतानादेखील संबंधित अधिक्षक अभियंता यांनी स्पील वर्क प्रोग्रामच्या १० टक्क्यांहून अधिक ६८५ कोटी रुपये इतक्या रकमेच्या निधीचा स्पील वर्क कार्यक्रम मंजूर करुन आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मुंबई बजेटमध्ये शिल्लक कामाच्या लेखाशिर्षाअंतर्गत कार्यक्रमात (स्पील वर्क प्रोग्रॅम) मागील अपूर्ण बजेटच्या निधीची तरतुद करुनच शिल्लक रकमेची कामे करण्यात येत असताना मागील वर्षी मंजूर झालेल्या उपलब्ध निधीच्या (नॉन प्लॅन वर्क) १० टक्क्यांहून जास्त कामे मंजूर करता येत नसतानाही १० टक्क्यांहून अधिक कामे मंजूर करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) व (२) विषयाधीन प्रकरणाची अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना चौकशी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
चौकशी अहवालातील निष्कर्षानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येईल.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथील महापालिकेच्या शाळांमध्ये पुरविला जाणारा निकृष्ट दर्जाचा पोषण आहार

**(१७) * ७१७६५ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (जि.नाशिक) महापालिकेच्या शाळांमध्ये मुलांना निकृष्ट दर्जाचा पोषण आहार देण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेकडून पोषण आहार पुरविण्यासाठी अल्प उत्पन्न सेवाभावी संस्था, अनुशिया बचत गट व इतर महिला बचत गटांना कंत्राट देण्यात आले असून नियम व निकषाप्रमाणे सदर पुरवठा होत नसल्याच्या तक्रारी शाळांच्या मुख्याध्यापकांनी स्थानिक लोकप्रतिनिधींकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू पोषण आहार पुरवठा तसेच अदा करण्यात आलेली देयके यात गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मालेगांव महापालिकेच्या शाळांमध्ये झालेल्या निकृष्ट पोषण आहार पुरवठ्याबाबत तक्रारींची चौकशी करण्याकरिता पाच सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) अंशत: खरे आहे.
मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील ८५ खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांपैकी ५ शाळांनी पोषण आहार निकृष्ट दर्जाचा मिळत असल्याची तक्रार केलेली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४), (५) व (६) मालेगाव महानगरपालिका कार्यक्षेत्रातील केंद्रिय स्वयंपाकगृह प्रणालीबाबत प्राप्त तक्रारींची चौकशी करण्याकरीता शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, नाशिक यांच्या कार्यालयामार्फत चार सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.
सदर समितीने दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ रोजी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालानुसार शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद, नाशिक यांच्यामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**राज्यात सखी सावित्री समिती स्थापन करणेबाबत**

**(१८) * ७१६८९ श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.जयकुमार रावल (शिंदखेडा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती अश्विनी जगताप (चिंचवड), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्रीमती लताबाई सोनवणे (चोपडा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), ॲड.आशिष जयस्वाल (रामटेक), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १२५ व्या स्मृतीदिनानिमित्त राज्यात विद्यार्थ्यांची नोंदणी, सुरक्षा, बालकांच्या हक्कांचे संरक्षण, मुलींचे शिक्षण व आरोग्य तसेच शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणून त्यांच्याकडे विशेष लक्ष देण्यासाठी विविध स्तरावर “सखी सावित्री समिती” स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दिनांक १० मार्च, २०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करुन शाळा स्तरावर व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षतेखाली सदर समिती स्थापन करण्याचे आदेश देवूनही अद्याप त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विद्यार्थ्यांच्यादृष्टीने अत्यंत महत्वाच्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याकरिता शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) शासन परिपत्रक दिनांक १० मार्च, २०२२ अन्वये राज्यातील सर्व शाळांमध्ये मुला-मुलींच्या सुरक्षिततेसाठी व निकोप आणि समतामुलक वातावरण निर्मितीसाठी शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्यात आलेल्या आहेत.

(२) दिनांक १० मार्च, २०२२ च्या शासन परिपत्रकास अनुसरुन शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्राथमिक, शिक्षण संचालनालयाकडून शाळा, केंद्र, तालुका/शहर स्तरावर सखी सावित्री समिती गठीत करण्याबाबत दिनांक ०५.१०.२०२३ च्या पत्रान्वये निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नवी मुंबईतील महापे व तुर्भे येथे भेसळयुक्त अन्न पदार्थांचा साठा जप्त केल्याबाबत**

**(१९) * ७१६२३ श्री.लहू कानडे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील महापे व तुर्भे येथील दोन शीतगृहांची तपासणी केली असता खारीक, खजूर आणि लवंग काडी असा सुमारे ७ कोटी २७ लाख ६८ हजार ८५० रूपयांचा भेसळयुक्त साठा अन्न व औषध प्रशासन विभागाने जप्त केल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापे येथे क्रिसेंट कोल्डस्टोरेज प्रा. लि. मधून ९ हजार ३४ किलो खारीक व खजूरचा सुमारे २ कोटी रुपयांचा तसेच मयूर कोल्डस्टोरेज मधून २ लाख ४६ हजार ४०६ किलो लवंग काडीचा सुमारे ५ कोटी रुपयांचा भेसळयुक्त साठा जप्त केला असून या मालावर अन्नसुरक्षा व मानके कायद्याअंतर्गत आवश्यक व बंधनकारक लेबल लावलेले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१) व (२) हे खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन, ठाणे कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिनांक १०.१०.२०२३ रोजी मे. क्रिसेंट कोल्ड स्टोरेज, महापे, नवी मुंबई येथे खजूर व खारीक या अन्न पदार्थांचे एकूण १० अन्न नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित एकूण ९५०३४ किलो वजनाचा एकूण रु.१,७२,६२,०००/- किंमतीचा साठा कमी दर्जाचा असल्याच्या संशयावरून तसेच मिथ्याछाप/विनालेबल असल्याने जप्त करून सिलबंद करून सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

तसेच, अन्न व औषध प्रशासन, ठाणे कार्यालयातील अन्न सुरक्षा अधिकारी यांनी दिनांक ११.१०.२०२३ रोजी मे.मयूर कोल्ड स्टोरेज, तुर्भे, नवी मुंबई या आस्थापनेतून लवंग कांडी, लवंग, मेथी दाणे आणि जीरा या अन्न पदार्थांचे एकूण १९ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेऊन उर्वरित एकूण २,४६,४०७ किलोचा एकूण रु.५,५५,०६,८५०/- किंमतीचा साठा हा मिथ्याछाप/विनालेबल असल्याच्या व मानकानुसार नसल्याच्या संशयावरुन जप्त करून व सिलबंद करून विक्रेत्याच्या ताब्यात सुरक्षित ठेवण्यात आला आहे.

(३) मे.क्रिसेंट कोल्ड स्टोरेज महापे, नवी मुंबई या आस्थापनेतून १० अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले होते. त्यापैकी ०९ अन्न नमुने अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, मुंबई यांनी असुरक्षित घोषित केले असून ०१ अन्न नमुना प्रमाणित असल्याचे घोषित केले आहे. सदर प्रकरणी अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ अंतर्गत पुढील नियमोचित कार्यवाही करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे मे.मयूर कोल्डस्टोरेज, तुर्भे, नवी मुंबई, या अन्न आस्थापनेतून एकूण १९ अन्न नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून सदर अन्न नमुने अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, बांद्रा, मुंबई यांचेकडे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. सदर अहवाल अद्याप प्रतिक्षाधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील शासकीय शाळांमध्ये अद्ययावत सोयी- सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) * ७१९२९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.उच्च न्यायालयाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना राज्यातील १२ जिल्हयातील किमान १५ शाळांची आकस्मिक पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक २५ जुलै, २०२२ रोजी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात सादर केलेल्या अहवालात राज्यातील अनेक शाळांची व स्वच्छतागृहांची अतिशय दयनीय अवस्था असून जिल्हयातील दुर्गम व ग्रामीण भागातील बहुतांश शाळांमधील वेंडिंग मशीन मध्ये सॅनिटरी पॅड्स नसणे, त्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसणे, स्वच्छतागृहे खुली व अस्वच्छ असणे तेथे पाण्याची व्यवस्था नसणे इ. सुविधांचा अभाव असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत मा.उच्च न्यायालयाने तीव्र शब्दात नापसंती व खंत व्यक्त केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शाळांमध्ये पुरेशा व अद्ययावत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिपक केसरकर :** (१) होय.
(२) व (३) मा.उच्च न्यायालयाने दिनांक २५.०७.२०२२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांना बारा जिल्ह्यांमधील प्रत्येकी पंधरा शाळांमध्ये अचानक भेटी देवून शाळांतील स्वच्छतागृह व सॅनिटरी पॅड वितरण व विल्हेवाट या विषयी अहवाल सादर करण्याबाबत आदेश दिले होते. त्याबाबतचा अहवाल विधी सेवा प्राधिकरणाने मा. न्यायालयास सादर केला आहे. मा.न्यायालयाने ज्या शाळांमध्ये स्वच्छतागृहे व सॅनिटरी पॅड उपलब्धता याबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे त्या शाळांना पुन्हा भेटी देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश दिनांक ११.१०.२०२३ रोजी दिले आहेत. याबाबत न्यायप्रविष्ठ जनहीत याचिकेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ मध्ये शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ९९४० शाळांना सॅनिटरी पॅड सह वेंडींग मशीन व इनसिनरेटर उपलब्ध करून देण्यात आले असून सन २०२३-२४ मध्ये ८२०३ शाळांना सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.

आवश्यकतेनुसार व निधी उपलब्धतेनुसार जिल्हा परिषद सेस फंड, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा खनिज निधी, १५ वा वित्त आयोग, आमदार- खासदार निधी, सी.एस.आर फंड, व समग्र शिक्षा अभियान इत्यादींमधुन स्वच्छतागृहांचे बांधकाम व स्वच्छता यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची तजवीज ठेवली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सरलांबे (ता.शहापूर, जि.ठाणे) या गावच्या हद्दीतील समृध्दी महामार्गावर होणाऱ्या भीषण अपघातांबाबत

**(२१) * ७१६७६ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सरलांबे (ता.शहापूर, जि.ठाणे) या गावच्या हद्दीतील समृध्दी महामार्गाच्या १६ नंबर पॅकेजमध्ये पिलरवर गर्डर लाँचरद्वारे गर्डर चढविण्याचे काम सुरु असताना अपघात झाल्याचे दिनांक २ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर अपघातात २० कामगार व अभियंत्याचा मृत्यू झाला असून अनेक व्यक्ती जखमी झाल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाधितांना आर्थिक मदत तसेच अशा प्रकारचे अपघात टाळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे :** (१) होय, अंशत: खरे आहे.
सदर अपघात दिनांक ०२.०८.२०२३ रोजी झालेला नसून दिनांक ३१.०७.२०२३ रोजी झालेला आहे.
(२) हे खरे आहे.

सदर अपघातामध्ये १३ कामगार, २ अभियंते व ५ कर्मचारी असा २० जणांचा मृत्यू झाला व ३ कामगार जखमी झाले आहेत.
(३) सदर अपघातातील बाधितांना मूळ कंत्राटदार मे. नवयुगा इंजिनियरिंग कं. लि. यांचेकडून मृतांना प्रत्येकी ५ लाख रुपये व जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये आर्थिक मदत करण्यात आली आहे. तसेच, उपकंत्राटदार मे. व्ही एस एल लि. यांचेकडूनही मृतांना प्रत्येकी ५ लाख रुपये व जखमींना प्रत्येकी १ लाख रुपये आर्थिक मदत करण्यात आली आहे. ESI नुसार पात्र असणाऱ्या ९ मृतांच्या वारसांना पेन्शन व इतर फायदे मिळणेसाठी कंत्राटदाराने Employee State Insurance Corporation (ESIC) यांच्याकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत.
तसेच, उर्वरित ११ मृतांच्या वारसांना Workmen Compensensation Act नुसार देय असलेली एकूण रक्कम रु. १,६८,०६,८२५/- कंत्राटदाराने संबधितांना देणेसाठी कामगार आयुक्त कार्यालय, ठाणे यांचेकडे जमा केली आहे.
अपघात टाळण्यासाठी खालीलप्रकारे जाणीवपूर्वक खबरदारी घेण्यात येत आहे :-

Safety Jacket, Helmet, Safety belt या साधनांचा वापर करण्यात येतो. तो पूर्वीप्रमाणे सुरु ठेवण्यात येत आहे. Concrete Segment चे त्रयस्थ तांत्रिक तज्ज्ञांकडून तपासणी करुन घेण्यात येत आहे. प्रत्येक गर्डर सेक्शनची उभारणी (Erection) केल्यानंतर लाँचिग क्रेनची फेरतपासणी करण्यात येत आहे. प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी अत्यावश्यक तेवढेच अभियंता, तंत्रज्ञ, ऑपरेटर व कुशल कामगार ठेवण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदांबाबत

**(२२) * ७१९३३ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.धिरज देशमुख (लातूर ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.सदा सरवणकर (माहिम), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मोठ्या प्रमाणात हॉटेल्स व दुकानांमध्ये भेसळयुक्त पदार्थांची विक्री होत असून बनावट औषधांमुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न पदार्थ बनविणाऱ्या आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी न करणे, अन्न पदार्थांची मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमधून तपासणी न करणे, मान्यताप्राप्त व आधुनिक प्रयोगशाळांची कमी संख्या, निधीची कमी तरतूद तसेच यासाठी आवश्यक असणारी सहाय्यक आयुक्त, पर्यवेक्षक, निरीक्षक व अन्य पदे रिक्त असणे इत्यादी अनेक कारणांमुळे अशा प्रकारच्या भेसळीवर नियंत्रण आणण्याकडे विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रिक्त पदांमुळे पर्यवेक्षण, तपासणी, दोषसिध्दी तसेच अन्य प्रकारे नियंत्रण ठेवण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, रिक्रुटमेंट ऑफ असिस्टंट कमिशनर अँड ड्रग इंस्पेक्टर या नियमांनुसार पदांवरील व्यक्तीची नेमणूक करण्याबाबतचे नियम असून मेडिकल एज्युकेशन ड्रग डिपार्टमेंटकडून नियम तयार करण्याची प्रक्रिया गत ३ वर्षांपासून पूर्ण झाली नसल्याने या नेमणुकांमध्ये अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणांची शासनाने चौकशी करुन उपरोक्त संदर्भात तातडीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धर्मरावबाबा आत्राम :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० व त्याअंतर्गत तरतूदीनुसार व प्राप्त होणा-या माहितीच्या आधारे औषधांचे नमुने वेळोवेळी घेण्यात येतात. तसेच, विनापरवाना उत्पादन व विक्रीच्या प्रकरणात चौकशी करून कारवाई करण्यात येते.

अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ व त्यांअंतर्गत नियम व नियमने, २०११ नुसार हॉटेल, अन्न उत्पादक, अन्न पदार्थाचे वितरक, किरकोळ आणि घाऊक विक्रेते तसेच, इतर अन्न आस्थापनांची नियमितपणे तपासणी करून अन्न नमुने विश्लेषणासाठी घेतले जातात. विश्लेषण अहवालानुसार संबंधित आस्थापनेस नोटीस पाठवून अथवा तडजोड अर्ज दाखल करून आर्थिक दंडाची कारवाई करण्यात येते. नोटीस मधील नमूद त्रुटींची पूर्तता न केल्यास संबंधित आस्थापनेचा परवाना निलंबित / रद्द केला जातो. तसेच कमी दर्जाच्या व मिथ्याछाप अन्न नमुने प्रकरणी न्यायनिर्णय / तडजोड प्रकरणे दाखल करून द्रव्यदंड आकाराला जातो व असुरक्षित अन्न नमुने प्रकरणी मा.न्यायालयात खटला दाखल केला जातो.

अन्न व औषध प्रशासनात सहायक आयुक्त (अन्न) यांची एकूण ९० पदे व अन्न सुरक्षा अधिकारी यांची एकूण ३५० पदे मंजूर आहेत. सदर संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास मागणीपत्र पाठविण्यात आले असून त्यानुसार पदभरतीची प्रक्रिया सुरु आहे.
(४) व (५) हे अंशत: खरे आहे.

अन्न व औषध प्रशासन विभागातील सह आयुक्त (औषधे), सहायक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक या संवर्गाच्या सुधारीत सेवा प्रवेश नियमाचे प्रारुपास संबंधित विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांची मान्यता प्राप्त झाली असून ते मा.राज्यपाल महोदय यांच्या मान्यतेस्तव सादर केले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील राईस मिलमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२३) * ७१६७७ श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर), श्री.पी.एन.पाटील (सडोलीकर) (करवीर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख**

**(मालाड पश्चिम), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात जिल्हा मार्केटिंग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळाच्या वतीने आधारभूत धान खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांकडून हमी भावाने खरेदी केलेला धान राईस मिलकडून भरडाई करुन शासकीय गोदामात जमा करणे आवश्यक असताना राईस मिलधारक तसेच संबंधित सर्व अधिकाऱ्यांच्या संगनमताने धान भरडाईमध्ये जवळजवळ रुपये ५०० कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाला असून भरडाईसाठी देण्यात आलेल्या उच्च दर्जाच्या तांदळाऐवजी निकृष्ट दर्जाचा व कमी भावाचा तांदूळ शासकीय गोदामात जमा करण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राईस मिलमध्ये विद्युत जोडणी नसताना मिलींग केल्याचे कागदोपत्री दर्शविणे, डी.ओ.पेक्षा कमी प्रमाणात तांदूळ जमा करणे, नियमित व सामाईक डी.ओ.करिता स्वतंत्र बँक गॅरेंटी न घेणे, बोगस बँक गॅरेंटी, हितसंबंध असलेल्या राईस मिलला भरडाईसाठी मोठ्या प्रमाणात धान देणे, वाटप करण्यात आलेल्या लॉटमध्ये गैरप्रकार करणे इत्यादी अनेक गंभीर स्वरुपाचे गैरव्यवहार करण्यात आल्याचे देखील निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात राईस मिलवर तसेच सार्वजनिक वितरण प्रणालीच्या गोदामांवर छापे टाकून धान्याचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविले असता ते हलक्या प्रतीचे व खाण्यास योग्य नसल्याचे निदर्शनास आल्यामुळे शासनाने गडचिरोली जिल्हयातील सहा राईस मिलला तीन वर्षांसाठी काळ्या यादीत टाकण्याचे आदेश दिले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, तीन राईस मिलचा एकूण ९१.३ मेट्रीक टन BRL तांदूळ बदलून FAQ दर्जाचा तांदूळ जमा करण्याचे निर्देश देऊनही तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार त्याची अंमलबजावणी तीन आठवड्यात करणे अनिवार्य असतानाही दीड वर्षांचा कालावधी उलटूनही यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांनी कोणतीही कारवाई केली नाही तसेच केंद्र शासनाच्या तपासणी पथकाने या प्रकरणाचा परिपूर्ण अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देवूनही त्याची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या गंभीर प्रकरणाच्या अनेक लेखी तक्रारी स्थानिक नागरिक, संघटना तसेच लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी जिल्हाधिकारी, गडचिरोली, प्रधान सचिव व मंत्री, आदिवासी विकास विभाग, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांचेकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी गडचिरोली येथील तत्कालीन प्रादेशिक व्यवस्थापक, आदिवासी विकास महामंडळ यांचेवर FIR फाईल करुन फौजदारी कारवाई करण्याबाबतचे निदेश दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ रोजीच्या पत्रान्वये देऊनही यासंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(७) असल्यास, सदरहू गंभीर प्रकरणी राईस मिल व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याऐवजी मुदतवाढीची विनंती राज्याने केंद्र शासनाकडे केली, हे ही खरे आहे काय,
(८) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करुन तातडीने संबंधित राईस मिल व दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. छगन भुजबळ :** (१) या संदर्भात शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.
(२) या प्रकरणाची चौकशी करण्याकरीता नियुक्त करण्यात आलेल्या समितीने याबाबी निदर्शनास आणलेल्या आहेत.
(३) या संदर्भात दोषी आढळलेल्या ५ मिलर्सना ३ वर्षासाठी काळ्या यादीत टाकण्यात आले आहे.
(४) मायाश्री ग्रुप इंडस्ट्रीजचे तीनही नमुने तपासणीमध्ये BRL आढळून आले असले तरी सदर तांदूळ शासकीय बेस गोदामातील साठ्याशी संबंधित नसल्यामुळे तो बदलता येणे शक्य नसल्याचा अहवाल जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी सादर केला आहे.

(५) हे खरे आहे.
(६) हे खरे आहे. याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ यांच्यामार्फत पुढील कार्यवाही सुरू आहे.
(७) सीएमआर सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित झाल्यासच केंद्र शासनाकडून प्रतिपूर्ती प्राप्त होत असल्यामुळे तसेच गडचिरोली जिल्ह्यामध्ये सीएमआर साठवणुकीकरिता पर्याप्त जागा उपलब्ध नसल्याने पणन हंगाम २०२२-२३ धान भरडाईसाठी तसेच सीएमआर जमा करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली होती.
(८) वरीलप्रमाणे दोषींवर वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली आहे.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.